
ePaper

“महासत्ता नव्हे, भारत विश्वगुरू”; मोहन भागवत यांचं कॅनडात वक्तव्य



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™



पान 3 वरुन...

शितोळेंना ‘डच्चू’ नाही; भाजपची कोअर कमिटीच छोटी!

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 01 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भाजपा कार्यकारिणी बैठकीत घणाघात

# CJP म्हणजे 'काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम!'

महाईन्यूज । पुणे

**गेल्या काही दिवसांपासून CJP अर्थात कॉक्रोच जनता पार्टीतर्फे महाराष्ट्रासह देशभरातल्या सरकारी शाळांच्या परिस्थितीबाबत मुद्दे उपस्थित केले जात आहेत. सरकारी शाळांमधील परिस्थिती विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासारखी नसल्याचे अनेक व्हिडीओ CJPकडून प्रसारित करण्यात आले होते. स्वत: अभिजित दिपकेंनीही महाराष्ट्रातील काही शाळांचा दौरा केल्याचं दिसून आलं. मात्र, सीजेपीबाबत आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर आरोप केले आहेत. सीजेपी म्हणजे ‘काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम’ असल्याची टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.**



### उत्तरदायित्व नसलेल्या लोकांना काय विचारणार?

ज्यांना कसली अकाउंटेबिलिटीच नाही, अशा लोकांना प्रश्न विचारू शकत नाही, असंही फडणवीस यावेळी म्हणाले. “या मुद्द्यांच्या माध्यमातून ते भाजपाचा पाऊण भरलेला ग्लासही ते दाखवणार नाहीत. ते फक्त रिकामाच ग्लास दाखवतील. हे ते लोक आहेत, ज्यांना उत्तरंच द्यायची नाहीयेत. काँग्रेस, उद्धव ठाकरे गट, विरोधी पक्षातल्या कुणी विचारलं तर आम्ही त्यांना विचारू शकतो की आम्ही एवढ्या शाळा सुधरवल्या, तुम्ही किती सुधरवल्या ते सांगा. ते उत्तर देऊ शकत नाहीत. पण हे जे कोण उत्तरदायित्व नसलेले लोक आहेत, त्यांना हा प्रश्न विचारू शकत नाही. हा कार्यपद्धतीतला बदल आहे”, असं ते म्हणाले.



पुण्यात भारतीय जनता पक्षाच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत देवेंद्र फडणवीसांनी केलेल्या भाषणामध्ये अनेक राजकीय मुद्द्यांवर भाष्य करण्यात आलं. उपस्थित भाजपाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीसांनी राहुल गांधींवर परखड शब्दांत टीका केली. मात्र, त्याचवेळी दिल्लीत NEET पेपरफुटीप्रकरणी तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याविरोधात सुरू झालेल्या CJP च्या आंदोलकांवर व कोअर टीमवरही त्यांनी गंभीर आरोप केले.

देवेंद्र फडणवीसांनी सीजेपीच्या आडून काँग्रेसला पुनरुज्जीवन दिलं जात असल्याचा आरोप यावेळी केला. “CJP याचा अर्थ एखादी छोटी संघटना नाही. सीजेपी म्हणजे ‘काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम’ आहे. यात तुम्हाला जे ४-५ तरुण समोर दिसतायत, ते फक्त मोहरे आहेत. त्यांच्या बैठकांना भारत जोडोमधल्या त्याच १८० संघटना आहेत, ज्यांनी लोकसभेत भाजपाविरोधात नरेटिव्ह केला. आता तेच पुन्हा नवीन नाव घेऊन मैदानात उतरत आहेत”, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

“रामायणात कालनेमी होता. तो कधी साधूचा वेश घ्यायचा तर कधी कुणाचा. वेगवेगळ्या वेशात येऊन त्याचे राक्षसी हेतू साध्य करायचा. पण प्रभू श्रीरामांचं नाव घेतलं, तेव्हा कालनेमीही जिंकू शकला नाही. आम्ही प्रभू श्रीरामांनी दिलेल्या तत्वांनुसार राज्यकारभार चालवणारे लोक आहोत”, असं म्हणत फडणवीसांनी सीजेपीला रामायणातील कालनेमीची उपमा दिली.

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जाऊन तिथली परिस्थिती दाखवण्याच्या मुद्द्यावरही देवेंद्र फडणवीसांनी टीकास्र सोडलं. “आता ते शाळेत काय शिकवलं जातं ते बोलत नाही. आता ते मुद्द्यांवर बोलतात. कुठली शाळा चांगली आहे, कुठल्या शाळेत काय चाललंय वगैरे. जिल्हा परिषदेच्या शाळांपैकी ७०-७५ टक्के शाळा चांगल्या आहेत. पण २५ टक्के शाळा चांगल्या नाहीयेत. त्या चांगल्या करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण आपण अभावाच्या अर्थव्यवस्थेत आहोत. सगळ्या गोष्टी एकदम होत नाहीत. आपण अनेक कार्यक्रम चालवतो. त्यातून त्या शाळा आपण सुधरवत असतो. आज मला सांगताना आनंद वाटतो की जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा अशा आहेत जिथे प्रवेश घेण्यासाठी रांगा लागल्या आहेत. अनेक शाळांनी सुंदर काम केलंय. पण यापैकी एकही शाळा त्यांना दिसत नाहीये”, असा मुद्दा देवेंद्र फडणवीसांनी उपस्थित केला.

“ज्या शाळांमध्ये नवीन वर्गखोली बनली त्यामुळे जुनी वर्गखोली बंद करून ठेवली आहे, त्या जुन्या वर्गखोलीचा फोटो काढायचा आणि म्हणायचं शाळेतल्या वर्गखोल्या बंद पडल्या आहेत. पण काही हरकत नाही. आमचं तर मत आहे की कुणीही आम्हाला सत्य सांगितलं तर त्यावर आम्ही कारवाई करतो. पण त्यांचा हेतू तो नाहीये”, असा आरोपही मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना केला.

# पुण्यात डीजेचा दणदणाट की संस्कृतीचा साज?

## फडणवीसांचा सांस्कृतिक गणेशोत्सवाचा आग्रह; डीजेविरोधात बापट, कुलकर्णी आक्रमक.

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात डीजे आणि ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. डीजेच्या वापरावरून नागरिक, गणेश मंडळे आणि राजकीय नेत्यांमध्ये विविध भूमिका समोर येत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणेकरांना वादात न पडता सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे.**



पुण्यात भाजपच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत बोलताना फडणवीस यांनी, पुणेकरांनी संपूर्ण महाराष्ट्रासमोर सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव कसा साजरा केला जातो, याचा आदर्श घालून द्यावा, असे आवाहन केले. गणेशोत्सवात डीजे वाजवण्याच्या मुद्द्यावरून वाद निर्माण करण्याऐवजी पुण्याची सांस्कृतिक परंपरा जपण्यावर भर द्यावा, अशी त्यांची भूमिका होती.

दरम्यान, गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजेमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाविरोधात पुण्यात नागरिकांनी आवाज उठवला आहे. पुणे महापालिकेच्या गणेशोत्सवपूर्व बैठकीत डीजे आणि मोठ्या आवाजातील ध्वनिक्षेपकांवर बंदीची मागणी करणारे विद्यानंद बापट चर्चेत आले. त्यांच्या भूमिकेला काही गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी विरोध केल्यानंतर बैठकीत जोरदार खडाजंगी झाली. या घटनेनंतर डीजेच्या मुद्द्यावरील वाद अधिकच चर्चेत आला आहे.

भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनीही डीजेच्या दणदणाटाला विरोध करत पारंपरिक आणि समाजोपयोगी पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. उत्सवाला विरोध नसला तरी मोठ्या आवाजामुळे नागरिकांना त्रास होता कामा नये, असे त्यांनी स्पष्ट केले. ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न केवळ डीजेपुरता मर्यादित नसून सर्व प्रकारच्या मोठ्या आवाजाबाबत नियमांचे पालन झाले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. काही मंडळांनी यंदा डीजे न वापरण्याचा निर्णय घेतल्याचेही समोर आले आहे.

गणेशोत्सवासाठी पुणे पोलिसांनीही ध्वनीप्रदूषणा-संदर्भातील नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले असून, नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाईचा इशारा दिला आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात उत्सवाचा जल्लोष आणि ध्वनीप्रदूषणमुक्त वातावरण यांचा समतोल कसा साधला जाणार, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

### डीजेच्या दणदणाटावर पुण्यातून आवाज

पुण्यात गणेशोत्सवातील डीजे आणि ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. डीजेविरोधात नागरिकांचे आंदोलन सुरू असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणेकरांनी सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करून महाराष्ट्रासमोर आदर्श निर्माण करावा, असे आवाहन केले.

# उभ्या टँकरने घेतला तरुणाचा जीव; दुचाकीची जोरदार धडक

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे–पंढरपूर पालखी महामार्गावर पिसुर्टी गावच्या हद्दीत कामठवाडी स्मशानभूमीजवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या टँकरला पाठीमागून दुचाकीची धडक बसून झालेल्या अपघातात अभिजीत भगवान निगडे (वय ३८, रा. गुळुंचे, ता. पुरंदर) यांचा मृत्यू झाला. रविवारी (दि. ३०) रात्री साडेआठच्या सुमारास हा अपघात झाला. रस्त्याच्या डाव्या बाजूच्या दुचाकीच्या लेनमध्ये टँकर उभा करून ठेवण्यात आल्याने हा अपघात घडल्याचा आरोप असून, टँकर चालकाच्या निष्काळजीपणामुळे तरुणाला जीव गमवावा लागल्याची चर्चा आहे.**






पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिजीत निगडे हे त्यांच्या ताब्यातील दुचाकी घेऊन जेजुरीकडून नीरेकडे जात होते. पिसुर्टी गावच्या हद्दीतील पाटीलवाडा हॉटेलसमोर पालखी महामार्गावर डाव्या बाजूच्या दुचाकीच्या लेनमध्ये टँकर उभा होता. रात्रीच्या वेळी वाहतुकीच्या मार्गात टँकर उभा करून ठेवल्याने दुचाकीस्वाराला त्याचा अंदाज न आल्याने दुचाकी टँकरला पाठीमागून जोरदार धडक झाली. या अपघातात अभिजीत निगडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीचेही मोठे नुकसान झाले. या घटनेची खबर नितीन बबनराव निगडे यांनी दिली. याप्रकरणी जेजुरी पोलिस ठाण्यात फेटल मोटर अपघात रजिस्टर क्रमांक ०९/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली आहे. अपघाताची नोंद सोमवार (दि. ३१) रोजी मध्यरात्री १२ वाजून ४९ मिनिटांनी करण्यात आली.

दरम्यान, महामार्गावर रात्रीच्या वेळी वाहन सुरक्षित ठिकाणी न उभे करता वाहतुकीच्या लेनमध्ये उभे केल्याने अपघाताचा धोका वाढतो. पेट्रोल वाहतूक करणारा टँकर संबंधित चालकाने रस्त्याच्या वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने उभे केले होते का? उभ्या टँकरच्या मागे पुढे वाहन उभे आहे ते दिसावे म्हणून काही सुरक्षेची तजवीज केली होती का? याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. या अपघाताचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक केशव जगताप करीत आहेत.

### उभा टँकर ठरला जीवघेणा!

रात्री वाहतुकीच्या लेनमध्ये उभ्या असलेल्या टँकरला दुचाकीची पाठीमागून जोरदार धडक बसली. या दुर्घटनेत अभिजीत भगवान निगडे (३८, रा. गुळुंचे, ता. पुरंदर) यांचा मृत्यू झाला. टँकर चालकाच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाल्याचा आरोप असून, वाहनामागे सुरक्षेची आवश्यक उपाययोजना केली होती का, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# शितोळेंना 'डच्चू' नाही; भाजपची कोअर कमिटीच छोटी!

## २३ वरून १४ सदस्यांची फेररचना; महापालिका निर्णयप्रक्रियेत शितोळेंची भूमिका कायम

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**भाजपच्या पिंपरी-चिंचवड शहर कोअर कमिटीची फेररचना झाल्यानंतर 'पक्षनेते प्रशांत शितोळे यांना कोअर कमिटीतून डच्चू' अशा स्वरूपाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. मात्र, या बातम्यांमुळे निर्माण झालेल्या राजकीय चर्चेची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. कोअर कमिटीची सदस्यसंख्या २३ वरून थेट १४ करण्यात आली असून, हा बदल केवळ प्रशांत शितोळे यांच्यापुरता मर्यादित नसल्याचे स्पष्ट होते. त्याचवेळी महापालिका विषयांवरील निर्णयप्रक्रियेसाठी शितोळे यांचा समावेश असल्याचे भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी स्पष्ट केले आहे.**




### शितोळेंची भूमिका-पक्षाचा निर्णय अंतिम

फेररचनेनंतर प्रशांत शितोळे यांनीही संघर्षाची भूमिका न घेता पक्ष जो आदेश देईल, त्यानुसार जबाबदारी पार पाडण्याची भूमिका घेतली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाशी समन्वय साधून महापालिका विषयांवर निर्णय घेण्याचा त्यांचा सूर आहे. त्यामुळे या प्रकरणाला अंतर्गत संघर्षाचे स्वरूप देण्यापेक्षा पक्षाच्या निर्णयानुसार काम करण्याची त्यांची भूमिका अधिक ठळक ठरते. नव्या कोअर कमिटीच्या १४ सदस्यांच्या यादीत शितोळे नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. पण त्यांना महापालिका निर्णयप्रक्रियेतूनही वगळले, असा अधिक व्यापक दावा करण्यासाठी सध्या ठोस आधार नाही. उलट, शहराध्यक्षांनी महापालिका विषयांसाठी त्यांच्या समावेशाची स्पष्ट भूमिका मांडली आहे. त्यामुळे या संपूर्ण घडामोडीकडे पाहताना 'नाव यादीत नाही' आणि 'जबाबदारी काढून घेतली' यातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे.

भाजपच्या जुन्या कोअर कमिटीत २३ सदस्य होते. नव्या रचनेत ही संख्या १४ करण्यात आली आहे. म्हणजेच एकूण नऊ सदस्यांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे नव्या रचनेत एखाद्या व्यक्तीचे नाव नसणे ही बाब संपूर्ण फेररचनेच्या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. केवळ प्रशांत शितोळे यांचे नाव नव्या यादीत नाही, या एका बाबीवरून त्यांना पक्षाने 'डच्चू' दिला, असा निष्कर्ष काढणे हा फेररचनेचा एकांगी अर्थ ठरू शकतो.

नव्या १४ सदस्यांच्या यादीत प्रशांत शितोळे यांचे नाव नसल्याचे अधिकृत रचनेतून स्पष्ट होते. त्यामुळे या मुद्द्यावर कोणतीही लपवाछपवी करण्याचे कारण नाही. मात्र, कोअर कमिटीच्या संघटनात्मक यादीत नाव नसणे म्हणजे पक्षाच्या सर्व निर्णयप्रक्रियेतून बाहेर करणे असा त्याचा अर्थ होत नाही. विशेषतः महापालिकेच्या सत्तारूढ पक्षनेत्याची भूमिका आणि संघटनात्मक कोअर कमिटीची भूमिका या स्वतंत्र जबाबदाऱ्या आहेत.

### महापालिका निर्णयांसाठी शितोळेंचा समावेश

याच ठिकाणी 'डच्चू'च्या चर्चेला महत्त्वाचा छेद मिळतो. भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी महापालिकेसंदर्भातील निर्णय घेण्यासाठी प्रशांत शितोळे यांचा समावेश असल्याचे स्पष्ट केले आहे. म्हणजेच महापालिकेतील भाजपची भूमिका निश्चित करताना शितोळे यांना बाजूला करण्यात आलेले नाही. त्यामुळे 'पक्षाने शितोळेंना पूर्णपणे दूर केले' अशी प्रतिमा निर्माण करणे वस्तुस्थितीशी सुसंगत ठरत नाही. नव्या रचनेत भाजपने संघटनात्मक कोअर कमिटी अधिक मर्यादित केली आहे. त्याचवेळी महापालिका विषयांवरील निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेल्या पदाधिकाऱ्यांचा स्वतंत्र समन्वय ठेवण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. याचा अर्थ जबाबदाऱ्यांची पुनर्रचना असा होतो; राजकीय अस्तित्व संपविणे असा नाही.

### नऊ सदस्य कमी झाले, पण चर्चेचा केंद्रबिंदू एकच का?

२३ सदस्यांच्या समितीतून १४ सदस्यांची समिती झाल्याने नऊ सदस्य नव्या रचनेत राहिलेले नाहीत. ही वस्तुस्थिती असताना संपूर्ण फेररचनेपेक्षा केवळ प्रशांत शितोळे यांच्या नावाभोवती 'डच्चू'ची चर्चा रंगविणे ही राजकीयदृष्ट्या सोयीची मांडणी ठरू शकते. फेररचनेचा परिणाम अनेकांवर झाला असताना निर्णयाचा अर्थ केवळ एका नेत्याविरोधातील कारवाई म्हणून लावणे योग्य नाही. प्रशांत शितोळे हे महापालिकेतील भाजपचे सत्तारूढ पक्षनेते आहेत. त्यामुळे महापालिकेतील पक्षाची रणनीती, सभागृहातील भूमिका आणि स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची राहते. शहराध्यक्षांच्या स्पष्टीकरणानुसार महापालिका विषयांसाठी त्यांचा समावेश कायम असल्याने त्यांच्या राजकीय भूमिकेला पूर्णविराम मिळाल्याचे चित्र नाही.

### To The Point | अंतिम निष्कर्ष

भाजपची कोअर कमिटी २३ वरून १४ सदस्यांची झाली—नऊ सदस्यांची संख्या कमी झाली. नव्या यादीत प्रशांत शितोळे यांचे नाव नाही, हे खरे; पण त्यांना महापालिका निर्णयप्रक्रियेतून बाहेर करण्यात आलेले नाही. उलट, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी महापालिका विषयांसाठी शितोळेंचा समावेश कायम असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे 'प्रशांत शितोळेंना डच्चू' हा निष्कर्ष काढण्यापेक्षा 'कोअर कमिटीची संघटनात्मक फेररचना; महापालिका कामकाजासाठी शितोळेंची भूमिका कायम' हे वास्तव अधिक अचूक ठरते. कारण, निर्णय प्रक्रिया प्रभावी आणि गतीमान करण्यासाठी कोअर कमिटीची संख्या कमी केली असावी, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील ४१४ खासगी रुग्णालयांचा 'फायर एनओसी'कडे पाठ

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहरात लहान-मोठी ६७४ खासगी रुग्णालये, दवाखाने असून, त्यापैकी केवळ २६० रुग्णालयांकडे अग्निसुरक्षा प्रमाणपत्र आहे. उर्वरित ४१४ खासगी रुग्णालय चालकांनी व्यावसायिक अग्नि सुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र घेतले नसल्याचे उघडकीस आले आहे.**




महापालिकेच्या अग्निशामक विभागाने अग्निशामक सुरक्षा सप्ताहांतर्गत मे महिन्यामध्ये शहरातील रुग्णालयांची विशेष तपासणी मोहीम राबवली. यामध्ये फायर अलार्म, स्मोक डिटेक्टर, अग्निशामक यंत्रे, फायर हायड्रेंट, फायर लिफ्ट आणि आपत्कालीन मार्गांची प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णालय कर्मचाऱ्यांना महापालिकेने अग्निसुरक्षेचे प्रशिक्षण, उपकरणांची नियमित देखभाल आणि ना-हरकत दाखल्याचे वार्षिक नूतनीकरण बंधनकारक असल्याचे सांगितले. त्यानंतर २६० रुग्णालयचालकांनी अग्निशामक लेखापरीक्षण करून व्यावसायिक अग्नि सुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र घेतले. पण, अजूनही ४१४ रुग्णालय चालकांनी प्रमाणपत्र घेतलेले नाही, अशी माहिती अग्निशामक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास म्हणाले, 'वारंवार आवाहन करून, नोटीस देऊनही ४१४ रुग्णालय चालकांनी प्रमाणपत्र घेतले नाही. रुग्णालय चालकांनी अग्निशामक लेखापरीक्षण करून अग्निसुरक्षा प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा. अग्निशामक विभागाकडून रुग्णालय चालकांना आवश्यक ती मदत केली जाईल.' 'महापालिकेच्या सर्व रुग्णालयांचे अग्निशामक लेखापरीक्षण करण्यात आले आहे. त्रुटींची पूर्तता करण्यात येत आहे,' असे महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

### रुग्णालये 'फायर एनओसी'विना!

शहरातील ६७४ खासगी रुग्णालयांपैकी केवळ २६० रुग्णालयांनी अग्निसुरक्षा लेखापरीक्षण पूर्ण करून अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घेतले आहे. तब्बल ४१४ रुग्णालयांनी अद्याप प्रमाणपत्र घेतलेले नाही. वारंवार आवाहन व नोटिसा देऊनही नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांवर महापालिका कठोर पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे.



## भूमिका

**नेपाळमध्ये अलीकडे आलेल्या जलप्रलयाने हिमालयीन प्रदेशातील नैसर्गिक आपत्तींचे भयावह रूप पुन्हा एकदा समोर आणले आहे. हिमनदीचा मोठा भाग तुटणे, त्यातून सरोवरात अचानक प्रचंड पाणी साचणे आणि नैसर्गिक बांध फुटणे, या घटनांची साखळी किती विध्वंसक ठरू शकते, याची जाणीव या संकटाने करून दिली.**

# ‘वॉटर बॉम्ब’चा धोका; भारताने सावध व्हावे!



या दुर्घटनेमागे नेमके कोणते नैसर्गिक घटक कारणीभूत होते, याचा तपास होणे आवश्यक आहे. मात्र, या घटनेने चीनच्या ताब्यातील तिबेटमधील जलस्रोत आणि त्यांचा भारताच्या सुरक्षेवर होणारा संभाव्य परिणाम हा अधिक गंभीर प्रश्न ऐरणीवर आणला आहे. तिबेटमध्ये ब्रह्मपुत्रा नदीवर चीनकडून उभारल्या जाणाऱ्या महाकाय धरणामुळे भारताच्या जलसुरक्षेबाबत चिंता वाढणे स्वाभाविक आहे.

भारताच्या सीमेजवळ, भूकंपप्रवण आणि अत्यंत संवेदनशील हिमालयीन प्रदेशात एवढ्या मोठ्या प्रकल्पाची उभारणी होत असेल, तर त्याच्या सुरक्षिततेची माहिती संबंधित देशांना मिळणे गरजेचे आहे. धरण फुटल्यास किंवा अचानक मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यास अरुणाचल प्रदेश आणि आसामसह पूर्वोत्तर भारतातील अनेक भागांना त्याचा फटका बसू शकतो. त्याचे परिणाम बांगलादेशपर्यंत पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

चिंतेची बाब म्हणजे या प्रकल्पाची नेमकी क्षमता, आराखडा आणि संभाव्य पर्यावरणीय परिणाम याबाबत पुरेशी पारदर्शकता दिसत नाही. सीमापार वाहणाऱ्या नद्यांबाबत माहितीची देवाणघेवाण ही केवळ राजनैतिक सौजन्याची बाब नसून लाखो लोकांच्या जीविताशी संबंधित विषय आहे. पूर, भूस्खलन किंवा धरणातील तांत्रिक बिघाड याबाबत वेळेवर माहिती मिळाली, तर भारताला आपत्कालीन व्यवस्थापनाची तयारी करता येऊ शकते. मात्र, केवळ चीनकडून माहिती मिळण्याची अपेक्षा ठेवून भारताने स्वस्थ बसणे योग्य ठरणार नाही. उपग्रह निरीक्षण, नदीप्रवाह मोजणी, हवामान अंदाज, पूरपूर्व सूचना यंत्रणा आणि सीमावर्ती भागातील आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. अरुणाचल प्रदेशातील अपर सियांगसारख्या प्रकल्पांकडे केवळ वीजनिर्मिती म्हणून नव्हे, तर जलव्यवस्थापन आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या व्यापक दृष्टिकोनातून पाहावे लागेल. चीनसोबत मतभेद असले तरी संवादाचे दरवाजे बंद होऊ नयेत. नदीचे पाणी, पर्यावरण आणि आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या विषयांवर दोन्ही देशांमध्ये ठोस यंत्रणा उभी राहणे आवश्यक आहे.

पाण्याला राजकीय शस्त्र बनविण्याची कोणतीही शक्यता टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरही नियम आणि सहकार्याची चौकट मजबूत करावी लागेल. याच पार्श्वभूमीवर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचा रशिया दौरा आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोबाल यांचा चीन दौरा महत्त्वाचा ठरतो. आगामी ब्रिक्स संमेलनाच्या पार्श्वभूमीवर भारताला एकाच वेळी रशिया, चीन आणि इतर शक्तींशी संतुलित संबंध राखावे लागतील.

संवाद आणि कूटनीती ही भारताची ताकद आहे; पण त्यासोबत सामरिक, तांत्रिक आणि आर्थिक क्षमता वाढविणेही तितकेच महत्त्वाचे आहे.चीनला दोष देत राहण्यापेक्षा भारताने स्वतःची जलसुरक्षा अभेद्य करण्यावर भर दिला पाहिजे. हिमालयातील प्रत्येक बदलावर नजर ठेवणारी आधुनिक यंत्रणा, तातडीने इशारा देणारी व्यवस्था आणि संकटाच्या वेळी तत्पर प्रतिसाद देणारी यंत्रणा उभारली, तर कोणताही ‘वॉटर बॉम्ब’ भारतासाठी असहाय्य करणारा ठरणार नाही. सक्षम भारत हाच कोणत्याही संभाव्य संकटाला सर्वांत प्रभावी उत्तर आहे.

## प्रासंगिक »

# रिकामी घंटा

**एका गावात मंदिराच्या प्रवेश-द्वारावर मोठी घंटा होती. गावातील लोकांचा विश्वास होता की, संकट आले की घंटा वाजेल आणि सर्वांना सावध केले जाईल. मंदिराची जबाबदारी गणू नावाच्या तरुणाकडे होती.**

एकदा रात्री चोर गावात आले. त्यांनी काही घरांची दारे फोडली. गणूने आवाज ऐकला; पण त्याने विचार केला, “कुणीतरी दुसरा पाहील.” त्याने घंटा वाजवली नाही.

दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांनी चोरी झाल्याचे पाहिले. सर्वजण मंदिराजवळ जमले. गणू म्हणाला, “मला रात्री आवाज ऐकू आला होता.” गावचा सरपंच शांतपणे म्हणाला, “मग तू घंटा का वाजवली नाहीस?” गणूने मान खाली घातली. सरपंच म्हणाला, “संकटाच्या वेळी शांत राहणारी व्यवस्था कितीही मोठी असली, तरी तिचा उपयोग शून्य असतो.

इशारा देण्याची वेळ निघून गेल्यानंतर केलेली धावपळ निष्फळ ठरते.” त्या दिवसा-पासून गावकऱ्यांनी रात्रीची गस्त सुरू केली आणि घंटा वाजवण्याची जबाबदारी एकट्या व्यक्तीवर न ठेवता पथक तयार केले.

- तात्पर्य : **संकट येण्याची वाट पाहण्यापेक्षा त्यासाठी आधीच सज्ज असणे अधिक शहाणपणाचे.**

हजारो कोटी रुपये खर्चून उभारलेल्या समृद्धी महामार्गावर प्रवाशांची लूटमार होत असेल, तर हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नाही; तो संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार आहे.

# समृद्धी महामार्ग की दरोडेखोरांसाठी मोकळे रान?



वेगवान, सुरक्षित आणि नियंत्रित प्रवासाचे स्वप्न दाखविणाऱ्या या महामार्गावर एकाच रात्री लुटमारीच्या तीन घटना घडणे अत्यंत गंभीर आहे. एका कुटुंबाचे टायर पंक्चर करून १८ लाखांचा ऐवज लुटला गेला, तर अन्य घटनांमध्ये प्रवाशांना मारहाण करून दागिने आणि रोकड हिसकावण्यात आली. ही पद्धत पाहता गुन्हेगारांची हिंमत किती वाढली आहे, हे स्पष्ट होते.

रस्त्यावर धारदार वस्तू टाकून वाहनांचे टायर पंक्चर करणे ही केवळ लूटमारीची युक्ती नाही, तर प्रवाशांच्या जीवाशी खेळ आहे. भरधाव वाहनाचा टायर अचानक फुटल्यास चालकाचे नियंत्रण सुटून मोठा अपघात होऊ शकतो. त्यामुळे अशा गुन्ह्यांकडे केवळ चोरी किंवा दरोडा म्हणून न पाहता, निष्पाप प्रवाशांचे प्राण धोक्यात घालणाऱ्या गंभीर गुन्ह्याच्या दृष्टिकोनातून तपास होणे गरजेचे आहे.

समृद्धी महामार्ग हा ‘ॲक्सेस कंट्रोल’ मार्ग आहे. प्रवेश-निर्गमनासाठी ठरावीक मार्ग, सीसीटीव्ही, टोलनाके, नियंत्रण कक्ष आणि गस्ती पथके अशी यंत्रणा येथे असल्याचे सांगितले जाते. मग दहा-बारा जणांची टोळी महामार्गावर येते, वाहनांना अडवते, लूटमार करते आणि सहज पसार होते, हे कसे घडते? कुंपणाला भगदाडे आहेत का? अनधिकृत प्रवेशमार्ग आहेत का? गस्ती पथके नेमकी कुठे होती? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जनतेला द्यायलाच हवीत. आज फास्टॅग, सीसीटीव्ही, वाहन क्रमांक ओळखणारी यंत्रणा आणि मोबाइल लोकेशनसारखे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्याचा प्रभावी वापर केला तर गुन्हेगारांचा माग काढणे अधिक सोपे होऊ शकते. मार्चमध्येही याच महामार्गावर लुटमारीची घटना घडली होती. त्यानंतरही सुरक्षेत त्रुटी राहिल्या असतील, तर संबंधित यंत्रणांनी त्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

महामार्गाचे तातडीने सुरक्षा ऑडिट, कुंपणांची तपासणी, अनधिकृत प्रवेश रोखणे, रात्रीची गस्त वाढवणे आणि ठरावीक अंतरावर आपत्कालीन मदत पथके तैनात करणे आवश्यक आहे. ‘ॲक्सेस कंट्रोल’ हा केवळ पथकर वसुलीचा शब्द नसून प्रवाशांच्या सुरक्षिततेची हमी आहे. प्रवाशांसाठी महामार्ग सुरक्षित नसेल, तर त्याला ‘समृद्धी’ म्हणायचे तरी कसे?

## ।। अभंगवाणी ।।



आहाकटा त्याचे करिती पितर ।
वंशीं दुराचार पुत्र जाला ॥१॥

गळे चि ना गर्भ नव्हे चि कां वांज ।
माता त्याची लाजलावा पापी ॥ध्रु. ॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रत्नागिरीची 'गुंतवणूक' भरारी; २,१५९ कोटींचे करार

## उद्योगमंत्री उदय सामंतांची माहिती; राज्यातील १७ जिल्ह्यांत ८२,६५५ कोटींची गुंतवणूक

**महाईन्यूज । रत्नागिरी**

**कोकणात उद्योग येत नाहीत हा जुना समज पुसून काढत रत्नागिरीतील स्थानिक उद्योजकांनी औद्योगिक आणि पर्यटन विकासाला नवी गती दिली आहे. जिल्हा गुंतवणूक परिषदेत ६२ उद्योग घटकांशी तब्बल २,१५९.३७ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असून, या माध्यमातून २,४२६ रोजगारांची निर्मिती होणार आहे. यामध्ये १०० कोटी रुपयांच्या पंचतारांकित हॉटेल प्रकल्पासह विविध मोठ्या औद्योगिक प्रकल्पांचा समावेश आहे, अशी माहिती राज्याचे उद्योगमंत्री तथा रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली.**



रत्नागिरीतील सावंत पॅलेस येथे रविवारी (दि. ३० ऑगस्ट) जिल्हा गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मंत्री सामंत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी बोलताना त्यांनी रत्नागिरीचा जीडीपी गेल्या २० वर्षांच्या तुलनेत अनेक पटींनी वाढला असल्याचे सांगितले. स्थानिक उद्योजकांनी पुढाकार घेत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याची तयारी दाखवली आहे. या सर्व प्रकल्पांची १०० टक्के पूर्तता करून पुढील वर्षी जिल्ह्यात ५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा संकल्प पूर्ण करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा आणि परवानग्यांची प्रक्रिया सुलभ करण्यावर शासनाचा भर असल्याचे सामंत यांनी सांगितले. एमआयडीसीमध्ये जागा मिळवण्यासाठी 'मिलाप' ॲप सुरू करण्यात आले आहे. वैध अर्ज केल्यानंतर पुढील सोमवारी घरबसल्या थेट 'ऑफर लेटर' मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच 'मैत्री' पोर्टलवर अर्ज केल्यानंतर ३० दिवसांत दाखला देणे बंधनकारक करण्यात आले असून, या कालावधीत कार्यवाही न झाल्यास अधिकार आयुक्तांकडे जातात आणि त्यानंतर आठ दिवसांत मंजुरी देण्याची तरतूद असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यातील गुंतवणुकीबाबतही सामंत यांनी माहिती दिली. महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांमध्ये १,८३७ गुंतवणूक करार झाले असून, त्यातून तब्बल ८२,६५५ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या गुंतवणुकीतून १ लाख ५५ हजार ३८९ रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. आगामी काळात राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्येही जिल्हा गुंतवणूक परिषदांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### 'मिलाप' ॲप, 'मैत्री' पोर्टल सेवा

उद्योगांसाठी एमआयडीसीची जागा मिळवण्यासाठी 'मिलाप' ॲप सुरू करण्यात आले आहे. याद्वारे सोमवारी वैध अर्ज केल्यास पुढच्या सोमवारी घरबसल्या थेट 'ऑफर लेटर' मिळेल. तसेच 'मैत्री' पोर्टलवर अर्ज केल्यास ३० दिवसांत दाखला मिळणे बंधनकारक असून, उशीर झाल्यास अधिकार आयुक्तांकडे जाऊन पुढील ८ दिवसांत मंजुरी दिली जाते.

या परिषदेला उद्योग विभागाचे सहआयुक्त संदीप पाटील, अपर जिल्हाधिकारी मीनाक्षी कुंभार, एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकारी वंदना खरमाळे यांच्यासह अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने उद्योजक उपस्थित होते.

# ऑगस्टमध्ये पावसाची ओढ; पुढील दोन दिवसांत राज्यात जोर वाढणार

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात संपूर्ण ऑगस्ट महिन्यात पावसाने ओढ दिल्याने बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी वादळी पावसामुळे काही भागांत पाऊस झाला असला तरी राज्याचे एकूण पर्जन्यमान अपेक्षेच्या तुलनेत कमीच राहिले. दरम्यान, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून त्याची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. या हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे पुढील दोन दिवसांत राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.**



यंदा हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्र जाणवत असून, देशात नैर्ऋत्य मोसमी पावसाचे आगमनही उशिराने झाले. सुरुवातीपासूनच देशातील अनेक भागांत पावसाचे वितरण असमान राहिले. जून महिन्यात महाराष्ट्रात पावसाची तूट निर्माण झाली होती. मात्र, जुलैमध्ये बंगालच्या उपसागरातील सक्रिय हवामान प्रणालींमुळे मध्य भारतासह महाराष्ट्रातही चांगला पाऊस झाला आणि जूनमधील तूट काही प्रमाणात भरून निघाली.

मात्र, ऑगस्टमध्ये पुन्हा पावसाने राज्याकडे पाठ फिरवली. बंगालच्या उपसागरातील हवामान प्रणालींचा प्रभाव प्रामुख्याने उत्तर आणि पूर्व भारतातील राज्यांवर राहिल्याने महाराष्ट्रातील बहुतांश भाग कोरडा राहिला. काही ठिकाणी वादळी पावसाच्या सरी झाल्या असल्या तरी त्याचे प्रमाण समाधानकारक नव्हते.

विदर्भात बुधवारपासून पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज असून, हवामान विभागाने विदर्भातील सर्व जिल्ह्यांना वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' दिला आहे. गुरुवारी पावसाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता असून गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांना मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. उर्वरित विदर्भासह नांदेड जिल्ह्याला 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

शुक्रवारी विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत वादळी पावसाची शक्यता आहे. तसेच १ ते ६ सप्टेंबरदरम्यान कोकणातही पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ऑगस्टच्या तुलनेत सप्टेंबरच्या सुरुवातीला पावसाचा जोर वाढल्यास राज्यातील पावसाची तूट काही प्रमाणात भरून निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाची प्रतीक्षा असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना काहीसा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

### पुढील दोन दिवसांत पावसाचा जोर

बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र हळूहळू वायव्य दिशेने सरकण्याचा अंदाज आहे. त्याचा परिणाम म्हणून पुढील दोन दिवसांत विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. राज्यातील उर्वरित भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# युद्धाच्या सावटात मोदी-पेजेश्कियान भेट

## उद्योगमंत्री उदय सामंतांची माहिती; राज्यातील १७ जिल्ह्यांत ८२,६५५ कोटींची गुंतवणूक

**महाईन्यूज । बिश्केक**

**पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेश्कियान यांची किर्गिस्तानची राजधानी बिश्केक येथे भेट घेतली. शांघाय सहकार्य संघटनेच्या (SCO) शिखर परिषदेदरम्यान झालेल्या या बैठकीत दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांसह पश्चिम आशियातील ताज्या घडामोडींवर चर्चा केली. फेब्रुवारीमध्ये इराण आणि अमेरिका-इस्राइल संघर्ष सुरू झाल्यानंतर दोन्ही नेत्यांची ही पहिली प्रत्यक्ष भेट ठरली.**



भारत आणि इराणमधील दीर्घकालीन संबंध अधिक मजबूत करण्याबाबत दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. व्यापाराचा विस्तार आणि त्यात विविधता आणण्याची भारताची इच्छा असल्याचे मोदी यांनी बैठकीनंतर स्पष्ट केले. पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवरही दोन्ही नेत्यांनी विचारांची देवाणघेवाण केली.

पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाबाबत भारताने चिंता व्यक्त केली असून, सर्व प्रश्न संवाद आणि राजनैतिक मार्गाने सोडवले जावेत, ही भारताची भूमिका मोदी यांनी पुन्हा स्पष्ट केली. या भागात दीर्घकालीन शांतता आणि स्थैर्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

आखातातील संघर्षामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नौवहन आणि व्यापारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नौवहन आणि व्यापाराचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यावर मोदी यांनी भर दिला. व्यापारी जहाजे, खलाशी तसेच नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधांना कोणत्याही परिस्थितीत लक्ष्य केले जाऊ नये, असे भारताने स्पष्ट केले आहे.

इराणच्या भारतातील दूतावासानेही दोन्ही नेत्यांच्या भेटीची माहिती सोशल मीडिया पोस्टद्वारे दिली. पेजेश्कियान हे SCO आणि 'शांघाय प्लस' शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी किर्गिस्तानमध्ये दाखल झाले आहेत.

दरम्यान, आगामी ब्रिक्स शिखर परिषदेसाठी पेजेश्कियान यांचे भारतात स्वागत करण्यास आपण उत्सुक असल्याचे मोदी यांनी बैठकीत सांगितले. SCO आणि ब्रिक्ससारख्या बहुपक्षीय व्यासपीठांवर भारत आणि इराणमधील सहकार्य अधिक मजबूत करण्याची तयारीही भारताने व्यक्त केली आहे.

### युद्धानंतरची पहिलीच भेट

यावर्षी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस इराण आणि अमेरिका-इस्राइलमध्ये युद्धाला सुरुवात झाल्यापासून इराणचे राष्ट्रपती आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात झालेली ही पहिलीच भेट आहे. आजच्या भेटीत या दोन्ही नेत्यांमध्ये नेमकी कोणत्या मुद्यांवर चर्चा झाली हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नाही. मात्र दोन्ही नेत्यांमध्ये होर्मुझमधीन नाकेबंदीबाबत चर्चा झाली असावी, असे म्हटले जात आहे.

# अभिजीत दीपके यांची ५ सप्टेंबरची रॅली रोखण्यास 'सुप्रीम' नकार!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) वतीने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत आयोजित करण्यात येणाऱ्या निषेध मोर्चाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या रॅलीच्या विरोधात दाखल करण्यात आलेली याचिका सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने फेटाळून लावली. १२ आणि १३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेपर्यंत मोर्चा स्थगित ठेवण्याची मागणी याचिकेत करण्यात आली होती.**



सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी कोणतीही अनुचित घटना घडण्याची शक्यता असल्याचे मानण्यास ठोस कारण नसल्याचे निरीक्षण नोंदवले. प्रशासनाने कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. तसेच सर्व पक्षांनी शांततेने, जबाबदारीने आणि कायद्याच्या चौकटीत राहून वर्तन करावे, याची खात्री प्रशासनाने करावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सीजेपीने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीमध्ये निषेध मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. २५ जुलै रोजी केंद्र सरकारने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात अपयश आल्याचा आरोप पक्षाने केला आहे. या आश्वासनांच्या आधारावर परीक्षेतील कथित अनियमिततेविरोधातील ३६ दिवसांचे आंदोलन मागे घेण्यात आले होते. मात्र, आश्वासनांची पूर्तता न झाल्याचा दावा करत सीजेपीने पुन्हा आंदोलनाची भूमिका घेतली आहे.

शिक्षक दिनानिमित्त काढण्यात येणारा हा मोर्चा इंडिया गेटपासून सुरू होऊन दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत जाणार आहे. नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर आणि त्यानंतर फेरपरीक्षा घेतल्यानंतर जीव गमावलेल्या विद्यार्थ्यांचे कुटुंबीय या मोर्चाचे नेतृत्व करतील, असे सीजेपीने सांगितले. तसेच जुलै महिन्यातील आंदोलनादरम्यान कथित पोलिस अत्याचाराला सामोरे गेलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांचाही मोर्चात सहभाग राहणार आहे.


### सीजेपीची प्लान काय आहे?

सोमवारी, सीजेपीने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत एका निषेध मोर्चाची घोषणा केली. २५ जुलै रोजी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात केंद्र सरकार अपयशी ठरल्याचा आरोप सीजेपीने केला आहे, या आश्वासनांच्या आधारावर सीजेपीने परीक्षेतील अनियमिततेविरोधातील आपले ३६ दिवसांचे आंदोलन मागे घेतले होते. शिक्षक दिनानिमित्त काढण्यात येणारा हा मोर्चा इंडिया गेटपासून सुरू होऊन दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत जाईल.

सीजेपीच्या कार्यसमितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत मोर्चाचा निर्णय घेण्यात आला. केंद्र सरकारने आंदोलकांच्या संयमाला कमजोरी समजू नये, असा इशारा पक्षाने दिला आहे. सद्भावनेचा फायदा घेऊन सरकारने देशातील तरुणांचा विश्वासघात करू नये, असेही सीजेपीने म्हटले आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता ५ सप्टेंबरच्या मोर्चाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कोण सहभागी होणार?

CJP ने म्हटले आहे की, नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर आणि त्यानंतर फेरपरीक्षा घेतल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी आयुष्य संपवले होते त्यांचे कुटुंबीय या मोर्चाचे नेतृत्व करतील. याशिवाय, जुलै महिन्यातील आंदोलनादरम्यान ज्या विद्यार्थ्यांना कथितरित्या पोलीस अत्याचारांना सामोरे जावे लागले, त्यांचे कुटुंबीयही यात सहभागी होतील.



# इम्रान हाश्मीला स्वाइन फ्लूची लागण

अभिनेता इम्रान हाश्मीला स्वाइन फ्लूची लागण झाली आहे. एकीकडे त्याच्या 'आवारापन 2' चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. तर दुसरीकडे, त्याला स्वाइन फ्लूची लागण झाल्याचे समोर आल्याने चाहत्यांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.
अलीकडेच त्याने H1N1 ची टेस्ट केली होती, ज्याचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्याचे बोलले जात आहे. डॉक्टरांनी त्याला खबरदारी घेण्याचा, विलगीकरणात राहण्याचा आणि आरोग्याची योग्य ती काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. इम्रान हाश्मीने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करून आजारी असल्याचे आणि त्यामुळे बेंगळुरू येथील आपला कार्यक्रम रद्द केल्याची माहिती दिली. मात्र या पोस्टमध्ये त्याने त्याला स्वाइन फ्लू झाल्याचा उल्लेख त्याने केला नव्हता.
पोस्टमध्ये इम्रान हाश्मी याने लिहिले आहे की, "नमस्कार बेंगळुरू, माझी प्रकृती खूप खराब आहे आणि दुर्दैवाने, मी बेंगळुरूतील कार्यक्रमाला उपस्थित राहू शकणार नाही. पण हा कार्यक्रम रद्द झालेला नाही, तर तो केवळ पुढे ढकलण्यात आला आहे. मी तुम्हाला शनिवारी, 12 सप्टेंबर रोजी 'सनबर्न युनियन' येथे भेटेन. तुमची तिकिटे नवीन तारखेसाठी वैध राहतील. मी तुम्हाला भेटण्यासाठी खूप उत्सुक आहे."
दरम्यान, 2007 साली आलेल्या 'आवारापन' चा हा सिक्वेल असून चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'सॅकनिल्क' च्या आकडेवारीनुसार, 'आवारापन 2' ने 15 दिवसांत देशभरात 173.30 कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले आहे. या चित्रपटाने जगभरात 205.35 कोटी रुपयांचे 'ग्रॉस कलेक्शन' नोंदवले आहे. इम्रान हाश्मी सोबत या सिनेमात दिशा पाटणी मुख्य भूमिकेत आहे.



# डकोटाचा 'मर्लिन' लूक

हॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री डकोटा जॉन्सन सध्या एका आगामी चित्रपटावरून चर्चेत आहे. डकोटा ही हॉलिवूडची दिग्गज अभिनेत्री अन् गायिका राहिलेल्या मर्लिन मुन्रोच्या जीवनावर आधारित चित्रपटात मुख्य भूमिका साकारत आहे. यातील डकोटाचा फर्स्ट लुक समोर आला असून तो पाहून तुम्ही मर्लिन अन् डकोटातील फरक ओळखू शकणार नाही. फ्लॅश इम्पॅक्ट नाव असलेल्या बायोपिक शॉर्टफिल्ममधील फर्स्ट लुक अत्यंत लक्ष वेधून घेणारा आहे. यात डकोटा ही हुबेहुब मर्लिनप्रमाणे दिसत आहे. तिने एक कमालीचे ट्रान्सफॉर्मेशन करत स्वत:चे रुप पूर्णपणे बदललले आहे. यातील तिच्या लुकची सध्या जोरदार प्रशंसा केली जात आहे. फ्लॅश इम्पॅक्टचे दिग्दर्शन दिग्गज फिल्ममेकर मॅगी गिलेनहाल करत आहे. हा चित्रपट मुन्रो प्रसिद्ध होण्याचा काळ आणि ती वृद्धत्वापर्यंत जगली असती तर तिचे जीवन कसे असते या दोन्ही गोष्टी दाखविणार आहे. याचा प्रीमियर व्हेनिस फिल्म फेस्टिव्हलमध्ये होणार आहे. मर्लिन ही हॉलिवूडमधील पहिली लेडी सुपरस्टार होती. 50 च्या दशकात मुन्रोने इंग्रजी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य केले होते. ती अभिनेत्री असण्यासोबत कमालीची गायिका होती. जेंटलमेन प्रेफर ब्लाँड्स आणि सम लाइक इट हॉट यासारख्या अनेक चित्रपटांसाठी तिची आठवण काढली जाते.



# तारा सुतारियाची गंभीर आजाराशी झुंज.!

गणित हा विषय अनेकांना अवघड वाटतो, मात्र गणितात अडचण येणे आणि 'डिस्कॅल्क्युलिया' (Dyscalculia) हा विकार असणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. बॉलिवूड अभिनेत्री तारा सुतारिया हिने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत आपल्याला गणिताशी संबंधित 'डिस्कॅल्क्युलिया' हा विशिष्ट शिकण्याचा विकार असल्याचे उघड केले आहे. आर्थिक व्यवहार आणि पैशांच्या हिशोबाच्या बाबतीत तिचे वडील तसेच तिची अकाउंट्स टीम तिला मदत करत असल्याचेही तिने स्पष्ट केले. डिस्कॅल्क्युलिया हा एक विशिष्ट शिकण्याचा विकार (Specific Learning Disorder) आहे, ज्याला अनौपचारिक भाषेत 'मॅथ डिस्लेक्सिया' असेही म्हटले जाते. यामध्ये व्यक्तीला संख्या, गणिती चिन्हे, मोजणी आणि मूलभूत गणिती संकल्पना समजून घेणे, लक्षात ठेवणे किंवा त्यांचा प्रत्यक्ष वापर करणे अत्यंत कठीण जाते. मात्र, याचा अर्थ त्या व्यक्तीची बौद्धिक क्षमता किंवा बुद्धिमत्ता कमी आहे असा अजिबात होत नाही. डिस्कॅल्क्युलियावर कोणताही एक ठरावीक औषधोपचार उपलब्ध नसला, तरी लवकर निदान, विशेष शैक्षणिक पद्धती, नियमित सराव आणि तज्ज्ञांची मदत यामुळे दैनंदिन जीवनावरील याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर कमी करता येतो. मुलांना गणितात अडचण येत असल्यास त्यांना दोष देण्याऐवजी पालकांनी समस्या समजून घेऊन तज्ज्ञ डॉक्टरांकडून वा थेरपिस्टकडून योग्य मूल्यांकन करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

# दीप्ती शर्माचा वर्ल्ड रेकॉर्ड!

## महिला टी-२० मध्ये सर्वाधिक बळी घेणारी ठरली जगातील पहिली गोलंदाज

**महाईन्यूज । दुबई**

**महिला टी-२० आशिया चषक स्पर्धेत टीम इंडियाने ९४ धावांनी दणदणीत विजय मिळवत स्पर्धेचा श्रीगणेशा केला. शफाली वर्मा व दीप्ती शर्मा भारताच्या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. यादरम्यान दीप्तीने सामन्यात कमालीची गोलंदाजी करत तीन विकेट्स घेतल्या आणि या कामगिरीच्या बळावर दीप्तीने महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नवा विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे. महिलांच्या टी-२० क्रिकेटमध्ये आजवर कोणत्याच गोलंदाजाला अशी कामगिरी करता आली नव्हती.**

भारत आणि थायलंड यांच्यात महिला टी-२० आशिया चषकातील सामना ३० ऑगस्टला खेळवला गेला. हा सामना टीम इंडियाची स्टार फिरकीपटू दीप्ती शर्मा हिच्यासाठी अविस्मरणीय ठरला. तिच्या कारकिर्दीतील हा १५० वा टी-२० आंतरराष्ट्रीय (T20I) सामना होता आणि या सामन्यादरम्यान तिने एक नवा विक्रम केला. या कामगिरीसह, थायलंडची फिरकीपटू थिपचा पुत्तावोंग हिचा विक्रम मोडीत काढून ती महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज बनली आहे. थायलंडविरुद्धच्या या सामन्यात दीप्तीने केवळ सात चेंडूंमध्ये तीन बळी घेतले.



महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय (T20I) सामन्यांमध्ये सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांमध्ये दीप्ती शर्मा अव्वल स्थानावर आहे; तिने १५० सामन्यांत १७१ बळी घेतले आहेत. थायलंडची थिपचा पुत्तावोंग दुसऱ्या स्थानावर असून तिने १०९ सामन्यांत १७० बळी घेतले आहेत. रवांडाची हेन्रिएट इशिम्वे तिसऱ्या स्थानावर आहे, जिने १३४ सामन्यांत १६४ बळी घेतले आहेत. इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन चौथ्या स्थानावर असून तिने आतापर्यंत ११३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत १५४ बळी घेतले आहेत.

आशिया चषक सुरू होण्यापूर्वी, दीप्ती आणि थिपाचा या दोघीही प्रत्येकी १६८ बळींसह संयुक्तपणे पहिल्या स्थानावर होत्या. त्यानंतर, हाँगकाँगविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात एक बळी घेत थिपाचाने दीप्तीला मागे टाकलं आणि पहिलं स्थान पटकावलं. भारताच्या सामन्यात तिने आणखी एक बळी घेतला, ज्यामुळे तिची एकूण बळींची संख्या १७० वर पोहोचली. मात्र, थायलंडविरुद्धच्या सामन्यात तीन बळी घेत दीप्ती शर्माने थिपाचाला मागे टाकलं; तिने ही कामगिरी केवळ ७ चेंडूत करून दाखवली. म्हणजेच थायलंडविरूद्धच्या सामन्यात दीप्ती शर्माने ७ चेंडूत एकही धाव न देता ३ बळी घेतले.


भारत महिला आणि थायलंड महिला संघ यांच्यातील सामन्यात भारतीय संघाने ९४ धावांनी दणदणीत विजय मिळवत आशिया चषक मोहिमेची विजयी सुरुवात केली. प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ९ गडी गमावून १५९ धावा केल्या. याला प्रत्युत्तर म्हणून, थायलंडचा महिला संघ १६.१ षटकांत ६५ धावांत सर्वबाद झाला. शफाली वर्माने ३६ चेंडूंत ६४ धावांची खेळी केली आणि तिच्या या कामगिरीसाठी तिला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

## क्रिकेट इतिहासात अनोखा वर्ल्ड रेकॉर्ड! एक चेंडू टाकण्यासाठी १०० किमी धावला

**महाईन्यूज । इंग्लंड**

**क्रिकेटमध्ये गोलंदाज चेंडू टाकण्यासाठी काही पावलं धावत येतो आणि मग चेंडू रिलीज करतो, हे आपण नेहमीच पाहतो. मात्र, चक्क १०० किलोमीटर धावत येऊन चेंडू टाकण्याचा विक्रम कुणी केला तर? ऐकूनच आश्चर्य वाटेल. इंग्लंडमध्ये क्लब क्रिकेटपटू सॅम बोडुआनोने अशीच अविश्वसनीय कामगिरी करत विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे.**





क्रिकेटच्या इतिहासात शोएब अख्तर, ब्रेट ली आणि मायकल होल्डिंग यांसारखे लांब 'रन-अप' असलेले वेगवान गोलंदाज आपण पाहिले आहेत. मात्र, एका इंग्लिश क्लब क्रिकेटपटूने रन-अपची मर्यादाच पार करत एक अनोखा विश्वविक्रम केला आहे. सॅम बोडुआनो हा लांब पल्ल्याचा धावपटू आणि क्लब क्रिकेटपटू असून इन्स्टाग्रामवर 'IronBodz' या नावाने ओळखला जातो. त्याने केवळ एक चेंडू टाकण्यासाठी तब्बल ६२ मैल (सुमारे १०० किलोमीटर) धावत येत इतिहास घडवला.

या अनोख्या विक्रमासाठी सॅम बोडुआनोने 'क्रिकेटची पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावरून रन-अप सुरू केला आणि रात्रभर धावत तो वोकिंगमधील 'व्हॅली एंड क्रिकेट क्लब'मध्ये पोहोचला. इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातील लॉर्ड्स कसोटीच्या तिसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर सॅमने शनिवारी संध्याकाळी हा प्रवास सुरू केला. या प्रवासादरम्यान त्याने पांढरी क्रिकेट जर्सी परिधान केली होती आणि तो सलग १४ तासांहून अधिक काळ धावत राहिला.

१० किलोमीटरचे अंतर पूर्ण केल्यानंतर त्याने लंडन ब्रिजवरून एक 'व्ह्लॉग' शेअर केला. या व्हिडिओमध्ये त्याने प्रवासादरम्यानचा आपला अनुभवही टिपला आहे. सकाळी एका टप्प्यावर थकव्यामुळे तो एका विजेच्या खांबाला धडकला. या घटनेचाही समावेश त्याच्या व्हिडिओमध्ये आहे. यापूर्वी सर्वाधिक अंतराचा 'रन-अप' १४ मैल म्हणजेच सुमारे २४ किलोमीटर इतका होता. सॅमने तब्बल १०० किलोमीटर धावत हा विक्रम मोठ्या फरकाने मोडीत काढला.

विशेष म्हणजे, रविवार, ३० ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता चेंडू टाकण्याचा कार्यक्रम नियोजित होता. त्याआधीच सॅम निश्चित ठिकाणी पोहोचला होता. १०० किलोमीटरचा रन-अप पूर्ण केल्यानंतर त्याने जेव्हा आपला पहिला चेंडू टाकला, तेव्हा त्याचे वडील फलंदाज म्हणून क्रीजवर होते. चेंडू टाकल्यानंतर लगेचच त्याने पंच आणि स्कोअरर्सच्या उपस्थितीत एक अधिकृत क्रिकेट सामनाही खेळला. फलंदाजी करताना त्याने काही उत्कृष्ट फटकेही लगावले.

सॅमची ही ऐतिहासिक कामगिरी केवळ विक्रम करण्यापुरती मर्यादित नव्हती, तर त्यामागे एक कौतुकास्पद हेतूही होता. इंग्लंडचा माजी कर्णधार अँड्र्यू स्ट्रॉस यांची दिवंगत पत्नी रुथ स्ट्रॉस यांच्या स्मरणार्थ स्थापन करण्यात आलेल्या 'रुथ स्ट्रॉस फाउंडेशन'साठी त्याने ३,२०० पौंडांहून अधिक निधी उभारला.

यापूर्वी क्रिकेटचे पॅड्स घालून आणि हातात बॅट घेऊन ५ किलोमीटरची 'पार्करन' (Parkrun) २० मिनिटांपेक्षा कमी वेळेत पूर्ण करण्याचा पराक्रमही सॅमने केला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।
दि. 01 सप्टेंबर 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





# नात्यांपलीकडे जाऊन जपला "मायेचा धागा"

## 'तत्वम फाउंडेशन'तर्फे गुरुकुलमच्या 350 लेकरांसोबत साजरी झाली स्नेहाची राखीपौर्णिमा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**रक्ताच्या नात्यांपलीकडे जाऊन समाजातील उपेक्षित घटकाला प्रेमाची आणि आपुलकीची ऊब देणे हीच खरी सणांची सार्थकता असते, याचा प्रत्यय चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये आला. वंचित, भटके आणि विमुक्त समाजातील मुलांच्या चेहऱ्यावर उत्सवाचा खरा आनंद फुलवण्याच्या उदात्त भावनेतून 'तत्वम सोशल फाउंडेशन'च्या वतीने गुरुकुलममधील तब्बल 350 मुला-मुलींसोबत अनोखा रक्षाबंधन सोहळा आणि स्नेहभोजनाचा संवेदनशील उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.**



उपक्रमादरम्यान फाउंडेशनने नेलेल्या राख्यांनी वातावरण भावूक झाले होते. गुरुकुलममधील मुलींनी तेथील मुलांना मायेची राखी बांधली, तसेच उपस्थित फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनाही राखी बांधत अनोखा जिव्हाळा जपला. रक्षाबंधन हा केवळ रूढी परंपरेतील सण नसून समाजातील दुर्लक्षित घटकांप्रती वाटणारी माणुसकी, आदर आणि सामाजिक बांधिलकीची ती एक प्रतिज्ञा आहे, ही भावना यावेळी अधोरेखित झाली.

याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत व समाजसेवक पद्मश्री गिरीशकाका प्रभुणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वंचित आणि उपेक्षित समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी अशा आत्मीय उपक्रमांची नितांत गरज आहे. विशेषतः तत्वम फाउंडेशनच्या माध्यमातून सुशिक्षित तरुण वर्ग एकत्र येऊन सामाजिक जबाबदारीचे भान जपत असल्याबद्दल त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले, तसेच हे सेवाकार्य अविरत सुरू ठेवण्याचे आवाहन केले.

### वंचित घटकांसोबतचा आनंद..!



तत्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर म्हणाले की, सणांचा खरा आनंद हा समाजातील दुर्लक्षित व वंचित घटकांसोबत वाटून घेण्यातच असतो. या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच आमच्या सामाजिक कार्याची खरी ताकद असून, त्यांच्याशी जोडलेली ही नात्यांची आणि विश्वासाची वीण अधिक घट्ट करण्याचा आमचा निरंतर प्रयत्न राहील. या भावूक सोहळ्यानंतर सर्व 350 मुलांसाठी अत्यंत प्रेमाने आणि तृप्तीने भरवलेल्या स्नेहभोजनाने (अन्नदान) मुलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू फुलवले. या हृदयस्पर्शी उपक्रमासाठी तत्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर, यांच्यासह सचिव वंदना चौहान, खजिनदार मनीषा पिसाळ यांच्यासह सदस्य आयुष चौहान, संदीप पिसाळ, श्रीराम घाटूळ आणि रजनी मांडले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# साई मेरीगोल्ड सोसायटीची माणुसकीची सायकलस्वारी!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणपूरक उपक्रमाचा अनोखा आदर्श घालत पिंपळे सौदागर येथील साई मेरीगोल्ड सोसायटीतील नागरिकांनी एक कौतुकास्पद उपक्रम राबवला आहे. सोसायटीत दीर्घकाळापासून वापराविना पडून असलेल्या सायकलींची दुरुस्ती करून त्या गरजू आणि अनाथाश्रमातील मुलांना मोफत वाटण्यात आल्या.**



सोसायटीत अनेक जुन्या सायकली धूळ खात पडून होत्या. या सायकलींचा योग्य वापर व्हावा, या उद्देशाने सोसायटीचे चेअरमन प्रदीप खंदारे पाटील, सचिव संदीप भुंजाळ आणि खजिनदार नंदा बर्डे यांनी नागरिकांना त्या दान करण्याचे आवाहन केले होते.

या हाकेला रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वतःच्या खर्चाने व मेहनतीने सायकली दुरुस्त करून घेतल्या. या उपक्रमांतर्गत काळेवाडी येथील 'स्पंदन बाल आश्रम' आणि आदिवासी भागातील गरजू मुला-मुलींना सुमारे २० सायकलींचे वाटप करण्यात आले.

नव्या रूपात मिळालेल्या सायकली पाहून मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर हा क्षण पाहून सोसायटीतील नागरिकही भावूक झाले. "ही केवळ सायकलींची देणगी नसून मुलांच्या स्वप्नांना गती देणारा प्रयत्न आहे," अशी भावना रहिवाशांनी व्यक्त केली.

### नागरिकांचे मोलाचे योगदान

या उपक्रमासाठी सोसायटीतील नागरिकांनी वेळ, सायकली, आर्थिक मदत आणि दुरुस्तीच्या स्वरूपात सहकार्य केले. प्रशांत कुलकर्णी, संदीप गुंजाळ, हर्षल बर्डे, प्रशांत पोहरे, विष्णुकांत पांडे, अमित सोनार, दीपक देसाई, स्वप्नील महाजन, हर्षल पाटील, अतुल सिंघल, चेतन मोरे, शशांक भूधर, तुषार पाटील, जय नाईक, शब्बर हुसेन, वीरेंद्र ताजणे, अमित गुप्ता, पंकज माने, विनोद पाटील, अमित रसाळ, सनी राजेश, श्रीकांत जाधव, श्रीकांत लोंधे, राहुल चिंतावर आणि अविनाश फुलारी यांच्यासह अनेक सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

> सोसायटीत पडून असलेल्या निरुपयोगी सायकलींची दुरुस्ती करून त्या गरजू मुलांपर्यंत पोहोचवल्याने त्यांना मोठा आधार मिळाला आहे. मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद हाच आमच्या या उपक्रमाचा खरा पुरस्कार आहे.
>
> **- प्रदीप खंदारे (अध्यक्ष/संस्थापक, न्यू पुणे पब्लिक स्कूल, निगडी व चेअरमन, साई मेरीगोल्ड सोसायटी.**

साई मेरीगोल्ड सोसायटीच्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत असून, पुणे व महाराष्ट्रातील इतर गृहनिर्माण सोसायट्यांनीही अशा सामाजिक उपक्रमांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन नागरिकांकडून केले जात आहे.

# पिंपरी-चिंचवडकरांना 'ठोस कामा'ची प्रतीक्षा!

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशींच्या कारभारावर नागरिकांमध्ये नाराजी

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तपदाचा पदभार डॉ. विजय सूर्यवंशी यांनी १६ मार्च २०२६ रोजी स्वीकारला. साडेपाच महिन्यांचा कालावधी उलटूनही शहरातील मूलभूत नागरी प्रश्नांवर ठोस आणि जाणवण्याजोगा बदल दिसत नसल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक, पदपथ, अतिक्रमणे, स्वच्छता, अनधिकृत बांधकामे आणि नागरी सुविधांबाबत प्रश्न कायम असताना प्रशासनाकडून मात्र बैठका, आढावा आणि अधिकाऱ्यांना सूचना देण्याचे सत्र सुरूच असल्याची टीका होत आहे.**

आयुक्तपदाचा पदभार स्वीकारताना डॉ. सूर्यवंशी यांनी पिंपरी-चिंचवडच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविणे आणि सुरू असलेल्या पायाभूत प्रकल्पांना गती देणे हे प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, जवळपास सहा महिन्यांच्या कालावधीनंतर नागरिकांना या प्राधान्यक्रमांचा प्रत्यक्ष परिणाम कितपत जाणवतो, हा आता महत्त्वाचा प्रश्न ठरत आहे.

३१ ऑगस्ट रोजी आयुक्तांनी घेतलेल्या बैठकीत पुन्हा रस्ते दुरुस्ती, पदपथ मोकळे करणे, स्वच्छता, झाडांची छाटणी, अतिक्रमण हटविणे, अनधिकृत बांधकामांवर कारवाई, विद्युत सुरक्षेची तपासणी, कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी आणि नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. हे सर्व विषय महापालिकेच्या दैनंदिन आणि मूलभूत नागरी सेवांशी संबंधित आहेत. मग साडेपाच महिने आयुक्तांच्या नेतृत्वाखाली प्रशासन कार्यरत असताना याच समस्यांवर पुन्हा-पुन्हा बैठका घेऊन सूचना देण्याची वेळ का येते, असा सवाल उपस्थित होत आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर पाणीपुरवठ्याचा प्रश्न सर्वोच्च प्राधान्याचा असल्याचे आयुक्तांनी सांगितले होते. मात्र शहराच्या विविध भागांतील पाणीपुरवठ्याची स्थिती, पाण्याचे वेळापत्रक, वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज यावर प्रशासनाने कोणता ठोस रोडमॅप तयार केला? त्यातील किती टप्पे पूर्ण झाले? नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ कधी मिळणार? याचे उत्तर आता प्रशासनाने देण्याची वेळ आली आहे.



### मोशी दुर्घटनेने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

डॉ. सूर्यवंशी यांच्या कार्यकाळात मोशी कचरा डेपो दुर्घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाला. दुर्घटनेनंतर महापालिकेने कंत्राटदार आणि पर्यावरण विभागाविरोधात नोटीस व पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली. त्यानंतर दोन वरिष्ठ अभियंत्यांकडील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या काढून घेण्यात आल्या आणि चौकशी सुरू करण्यात आली. या दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापन, डेपोची सुरक्षितता आणि भविष्यातील कचरा व्यवस्थापनाचा शाश्वत आराखडा यावर ठोस परिणामकारक उपाययोजना कितपत पुढे गेल्या, हा प्रश्न अद्याप महत्त्वाचा आहे.

### 'शहर बदलणार' या अपेक्षेऐवजी नागरिकांचा भ्रमनिरास?

नवा पूर्णवेळ आयुक्त मिळाल्यानंतर पिंपरी-चिंचवडकरांच्या अपेक्षा मोठ्या होत्या. प्रशासनाला पूर्णवेळ नेतृत्व मिळाल्याने रखडलेली कामे मार्गी लागतील, पायाभूत सुविधांना गती मिळेल आणि शहराच्या वाढत्या समस्यांवर दीर्घकालीन उपाययोजना होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत होती. मात्र साडेपाच महिन्यांनंतर नागरिकांच्या चर्चेत 'काय नवीन झाले?' हा प्रश्न अधिक ठळक होत असल्याची टीका होत आहे. अनधिकृत बांधकामांवर कारवाई, अतिक्रमण हटविणे किंवा बैठका घेणे ही प्रशासनाची नियमित कामे आहेत. त्यापलीकडे शहराला दीर्घकालीन दिशा देणारे कोणते निर्णय घेतले गेले आणि त्यांची अंमलबजावणी किती झाली, याचा हिशेब आता महापालिका प्रशासनाने मांडणे आवश्यक आहे.

### 'आदेश' नव्हे, परिणाम हवा!

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा रस्ते, स्वच्छता, पदपथ, विद्युत सुरक्षा आणि विसर्जन व्यवस्थेबाबत आदेश देण्यात आले आहेत. पण नागरिकांचा प्रश्न साधा आहे— रस्ते केव्हा चांगले होणार? पदपथ केव्हा मोकळे होणार? पाणीपुरवठा केव्हा सुधारणार? अतिक्रमणे कायमची केव्हा हटणार? अनधिकृत बांधकामांना आळा केव्हा बसणार? आणि महापालिकेच्या प्रशासनाचा ठोस 'रोडमॅप' नागरिकांसमोर केव्हा येणार? साडेपाच महिन्यांनंतर आता नागरिकांना आणखी बैठका किंवा आणखी सूचना नको आहेत. आयुक्तांच्या आदेशांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि त्यातून दिसणारा परिणाम हवा आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या कार्यकाळाचे मूल्यमापन करण्याची वेळ आता आली आहे. बैठका किती झाल्या यापेक्षा शहरात प्रत्यक्ष बदल किती झाला, हा खरा प्रश्न आहे.

# महापालिकेची २ सप्टेंबरची विशेष सभा बेकायदेशीर; शहराध्यक्ष योगेश बहल

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची २ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा कायदेशीरदृष्ट्या अवैध असल्याचा दावा माजी महापौर व विद्यमान नगरसेवक योगेश बहल यांनी केला आहे. या सभेच्या विषयपत्रिकेतील २० ऑगस्ट रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रलंबित विषयांचा समावेश करण्यास त्यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. याप्रकरणी ॲड. असीम सरोदे अँड असोसिएटेड एलएलपीच्या माध्यमातून महापालिका आयुक्त, महापौर आणि नगरसचिव यांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे.**




बहल यांच्या म्हणण्यानुसार, २० ऑगस्ट २०२६ रोजी झालेली महापालिकेची सर्वसाधारण सभा अजेंड्यावरील सर्व विषयांवर चर्चा न करताच १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत तहकूब करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संबंधित तरतुदी आणि अनुसूची 'डी'नुसार तहकूब सभा ही मूळ सभेचेच कायदेशीर सातत्य मानली जाते. त्यामुळे २० ऑगस्टच्या सभेतील प्रलंबित विषय १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या तहकूब सभेतच चर्चेसाठी घेणे अपेक्षित असल्याचा दावा नोटीसमध्ये करण्यात आला आहे.

मात्र, २० ऑगस्टच्या सभेची विषयपत्रिका आणि त्यातील प्रलंबित विषयांपैकी निवडक १८ विषय २ सप्टेंबरच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेत समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप बहल यांनी केला आहे. मूळ सभेच्या अजेंड्यावर ३१ विषय असताना त्यापैकी केवळ १८ विषय विशेष सभेत पुन्हा घेण्यामागील कारण काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. तहकूब झालेल्या सभेतील निवडक विषय दुसऱ्या स्वतंत्र विशेष सभेत पुन्हा घेऊन त्यांना मंजुरी देण्याचा प्रयत्न हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी व सभाशास्त्राच्या नियमांच्या विरोधात असल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

"एकाच वेळी एकच विषय दोन वेगवेगळ्या सभांच्या कायदेशीर कक्षेत राहू शकत नाही," अशी भूमिका बहल यांनी घेतली आहे. २० ऑगस्टच्या सभेतील विषय २ सप्टेंबरच्या विशेष सभेत घेऊन मंजूर केल्यास, मूळ तहकूब सभेच्या निर्णयाला आणि तिच्या कायदेशीर अधिकाराला कोणताही अर्थ उरणार नाही, असा दावा त्यांनी केला आहे. महापालिका प्रशासनाने नियमांची अंमलबजावणी करण्याऐवजी चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या कामकाजाला प्रोत्साहन दिल्यास त्यातून प्रशासकीय मनमानीला खतपाणी मिळेल, असा आरोपही बहल यांनी केला आहे. प्रशासन प्रमुख म्हणून आयुक्त आणि नगरसचिव यांनी अशा प्रकारची कार्यवाही रोखणे अपेक्षित असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### विशेष सभेतील विषय वगळण्याची मागणी

कायदेशीर नोटीसमध्ये २ सप्टेंबरच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेतून २० ऑगस्टच्या तहकूब सभेतील सर्व समान व ओव्हरलॅपिंग विषय तात्काळ वगळावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित विषय केवळ १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या अधिकृत तहकूब सभेतच नियमानुसार चर्चेला घेण्यात यावेत, अशी भूमिका बहल यांनी मांडली आहे. या मागणीवर महापालिका प्रशासनाने योग्य ती कार्यवाही न केल्यास मनमानी व कथित बेकायदेशीर कार्यवाहीविरोधात सक्षम न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही कायदेशीर नोटीसमधून देण्यात आला आहे.

**DTE Code 6310**

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507